# पुस्तिका – २

<u>अॅक्वर्थ महापालिका कुष्ठरोग रुग्णालय तक्ता</u>

<u>रुग्णालयातील सर्व कार्यभार खाली दिलेल्या तक्त्याच्या अनुषगाने होतो.</u>



यशस्वीरित्या परिणामकारक सेवा पुरविण्यासाठी जनतेच्या पूर्ण सहकार्याची अपेक्षा आहे.

आमचेकडे दक्षता समिती सभासद आहेत. त्यांचबरोबर मिटींग घेऊन, तक्रारींबाबत, इतर सूचना तसेच पुढील कार्यवाहीबाबत चर्चा व सूचना केल्या जातात.

आमचेकडे तात्काळ तक्रार पेटी हॉस्पिटलच्या तळमजल्यावर योग्य ठिकाणी ठेवण्यात आलेली आहे.

सुविधांची पाहणी आणि नियोजन करण्यासाठी उप वैद्यकिय अधिक्षक / वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी हे नियमितपणे फेरफटका मारीत असतात. ते विभागातून नियमितपणे सोईस्कर सुविधा उपलब्ध होण्यासाठी रिपोर्ट/अहवाल घेत असतात.

सध्याच्या स्थितीत रुग्णालयाची खाटांची क्षमता २४० आहे. यामध्ये ४ पुरुष कक्ष व २ महिला कक्ष आहेत. सध्या रुग्णालयात एकूण ६ कक्ष आहेत. पुरुष कक्षात एकूण खाटांची क्षमता १६० आहे. व महिलांच्या खाटांची एकूण क्षमता ८० आहे.

बाह्यरुग्ण विभाग :

रुग्णालयातील बाह्यविभागाची वेळ : दररोज सकाळी ०८: ते ११.३०

दुपारी ०१.३० ते०२.३०

शनिवारी फक्त सकाळी ०८.३० ते ११.३०

* नवीन व जुने रुग्ण ( बाह्यरुग्ण )

* व्रणोपचार कक्ष

* सामाजिक वैद्यकिय कार्यकर्ता

* भौतिकोपचार कक्ष
    * सुघटन शल्यक्रिया – बाह्यरुग्ण कक्ष व शस्त्रक्रिया कक्ष (फक्त शुक्रवार)

रुग्णभरतीसाठी आवश्यक गोष्टी :

१) सामाजिक कारण
२) न भरणा-या जखमा
३) कुष्ठरोगांमुळे होणारी गुंतागुंतीची प्रक्रिया

रुग्णालयातर्फे पुरविण्यात येणा-या सेवा :

१) आंतररुग्ण सेवा :  सध्याची आंतररुग्ण संख्याभरती ५०% असुन सर्व आंतररुग्णांना अन्न, वस्त्र, निवारा या सुविधा पुरविल्या जाता. कुष्ठरोग व इतर संबधित आजारांवर वैद्यकीय उपचारांबरोबर पुनर्वसनात्मक व कल्याणकारी सेवाही आंतररुग्णांना पुरविल्या जातात.

२) आंतररुग्ण सेवा :  रोगनिदान व उपचार सुविधांबरोबर भौतिकोपचार, प्रयोगशाळा, दवाखाना, समाजसेवा व व्रणोपचार या सोयीही बाह्यरुग्ण विभागात उपलब्ध आहेत. या विभागात सरासरी ५० रुग्ण दररोज येत असतात.

३) कार्यक्षेत्रातील कार्य : राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मुलन कार्यक्रमांतर्गत महानगरपालिकेच्या इ, फ/उत्तर व फ/दक्षिण विभागात कुष्ठरोग´ विषयक सर्वेक्षण, आरोग्यशिक्षण व उपचार कार्यक्रम या रुग्णालयातर्फे हाती घेतले जातात.

४) पुर्नरचानात्मक शस्त्रक्रिया : रुग्णालयात एक सुसज्ज शस्त्रक्रिया गृह असून सायन रुग्णालयातील सहयोगी प्राध्यापक सुघटन शल्यचिकित्सक आठवड्यातून एकदा सेवा देण्यासाठी येतात.

५) प्रशिक्षण : वैद्यकीय विद्यार्थी व इतर निम्न वैद्य`कीय विद्यार्थी यांना प्रशिक्षण दिले जाते. तसेच वैद्यकीय अधिकारी व अवैद्यकीय पर्यवेक्षक यांना प्रशिक्षण देण्यात येते.
६) वैद्यकिय अभिलेख : रुग्णालय कुष्ठरोग कार्यक्रमविषयक सांख्यिकि अभिलेख जतन करुन वेगवेगळे अहवाल तयार करीत असते, आणि याव्दारे मुंबईतील राष्ट्रिय कुष्ठरोग निर्मुलन कार्यक्रमाच्या प्रगतीचा आढावा घेतला जातो.

सही/-
कार्यकारी आरोग्य अधिकारी
सार्वजनिक आरोग्य खाते